# ऑनलाईन इंटरनेट बँकिंगद्वारे फसवणूक करणारा जामतारा (झारखंड) येथील आरोपीस बँगलोर (कर्नाटक) येथून अटक

दिनांक रोजी ०२-५-२०२१ रोजी फिर्यादी डॉ. प्रणिता प्रदीप कश्यप, रा. मोहन नगर, वर्धा ज़ि. वर्धा यांनी गुगलवर मेक माय ट्रीपचा नंबर शोधून मिळालेल्या मोबाईल नंबरवर मेक माय ट्रीप बुकिंग करीता फोन केला असता अज्ञात आरोपीने फिर्यादीस AnyDesk App इंस्टाल करण्यास सांगून फिर्यादीस बँक खात्याची माहिती विचारून इंटरनेट बँकिंगद्वारे फिर्यादी यांचे बँक खात्यातुन एकुण ५०,०००/- रु. काढून फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली. फिर्यादी यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे दिलेल्या तक्रारीवरून अपराध क्र. ४४१/२०२१ कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ (डी) IT Act अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास सायबर सेल, वर्धा मार्फत करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये तांत्रिक माहिती काढण्यात आली. सदर तांत्रिक माहितीचे आधारे आरोपी हा झारखंड राज्यातील जामतारा येथील टोळीतील असून सध्या तो बंगलुर (कर्नाटक) येथे वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीचा शोध घेण्याकरीता पथक तयार करून इलेक्ट्रोनिक सिटी, बंगलुरू (कर्नाटक) येथे रवाना होऊन सदर पथकाने चिकतगुर, प्रपाती नगर, इलेक्ट्रोनिक सिटी, बंगलुरू (कर्नाटक) येथून आरोपी प्रेमकुमार राजकुमार शर्मा, वय २९ वर्ष, साहम मंडई टोला, जि. बोकारो (झारखंड) ह.मु. इलेक्ट्रोनिक सिटी, बंगलुरू (कर्नाटक) यास मोठ्या शिताफीने ताब्यात घेवुन त्याचेकडून १) विवो कंपनीचा मोबाईल किंमत ५०००/- रुपये, २) इनफिक्स कंपनीचा मोबाईल किंमत ५०००/- रुपये, ३) ८ वेगवेगळे बँकेचे ATM कार्ड, ४) नगदी १३,५००/- रुपये असा एकूण २३,५००/- रुपये चा माल जप्त करून गुन्हा उघड़किस आणला.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री सत्यवीर बंडीवार, पोलीस निरीक्षक श्री संजय गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांचे निर्देशाप्रमाणे पोनि महेंद्र इंगळे, सायबर शाखा, पोउपनि. प्रवीण पाटील, पो.स्टे. वर्धा शहर, पोलीस अंमलदार दिवाकर परिमल, अनूप राऊत, पवन निलेकर, पो.स्टे. वर्धा शहर, सायबर शाखा येथील दिनेश बोथकर, निलेश कट्टोजवार, विशाल मडावी, अक्षय राऊत, अनुप कावळे, शाहीन सैयद, अंकित जिभे, स्मिता महाजन यांनी केली.